# ॥ चैतन्य लहरी ॥



परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी

अंक क्र. ८

वर्ष १९९३ - ९४

## परम पूज्य श्री माताजींनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेतला होता. त्यावेळी त्यांनी लिहिलेली कविता

माँ तेरी जय हो
माँ तेरी जय हो, तेरा ही विजय हो

तेरी गीत से आज जग ये जीवित हो ।।धृ।।
तेरे गाँव के खेत भी गा रहे हैं

तेरे आज नगरों में जय जय की धुन है
तुम्हें देखके ये जगी दीन दुनिया
और वो गा रही है कि माँ तेरी जय हो ।।१।।

जब आँखों में आँसू, जूबाँ पे थे छाले
ये दिल गा रहा था कि माँ तेरी जय हो
चितारें हमारी गगन से भिडी थी
वहाँ लिख रही थीं की माँ तेरी जय हो ।।२।।

# ◆ गुरु पूजा ◆

## कबेला - इटली - दि. ४-७-९३

## (भाषणाचा सारांश)

आज आपण गुरु पूजा आयोजली आहे. मला तुम्ही आपले गुरु म्हणून मानता. गुरुविषयी असलेली संकल्पना माझ्या बाबतीत वेगळी आहे. सहसा गुरु हे कडक असतात आणि त्यांना सोशिकपण नसतो. संगीताच्या बाबतीत (त्यांना) कडक शिस्त अपेक्षित असते. रविशंकर, मोठे सतार वादक, गुरु संबंधी म्हणाले कीं एकदा ते एका वेळी बेसूर झाले, म्हणून त्यांच्या गुरुंनी तानपुरा घेऊन त्यांच्या डोक्यावर आपटला. परंपरा ठेवण्यासाठी त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना तशीच शिस्त लावली. असे असतांही शिष्य आपल्या गुरुंना चिकटून राहिले. ते त्यांची काळजी घेत. गुरु शिष्यांची नेहमी परीक्षा घेत असतात. शिवाजींच्या गुरुंनी एकदा त्यांना वाघिणीचे दूध आणण्यास सांगितले. शिवाजी जंगलात गेले आणि वाघिणीने आपल्या छाव्यांना दूध पाजल्यानंतर ते तिच्यासमोर वाकून म्हणाले "माझ्या गुरुंना तुझे दूध हवे आहे कृपा करुन तूं मला ते दे " वाघिणीने ते ऐकले व तिने त्यांना दूध घेऊ दिले. गुरुंची आज्ञा तुम्ही ऐकली तर अशक्य गोष्टी तुम्ही प्राप्त करुं शकता. दुसऱ्यांदा त्यांचे गुरु म्हणाले माझ्या पायावर मोठा फोड आला आहे. जर तो फोड तोंडाने शिष्याने शोषला तर तो बरा होईल. सगळ्यांना ते किळसवाणें वाटले, पण शिवाजींनी पुढे होऊन तो तोंडाने शोषला, तर तो झाकलेला आंबा होता.

शिष्यांची सतत परिक्षा घेतली जाते, प्रथम ते किती आज्ञाधारक आहेत हे पाहतात. तुम्ही सर्व पार झालेले आहात आणि तुम्ही स्वतःचे गुरु झाला आहात म्हणून या अटी मी तुमच्यावर लादत नाही. तुम्हाला पूर्ण स्वतंत्रता दिली गेली आहे. मी तुम्हाला जे हिताचे आहे ते कळकळीने सर्व प्रकारे सांगते पण इतर गुरुंसारखी तुमच्यावर जबरदस्ती करत नाही. ते शिष्यांना बडवून काढत. ते शिष्यांच्या बाबतीत कडक असत. शिष्य कुठल्याही बाबतीत कमी पडलेला त्यांना खपत नसे. काही शिष्यांना एका पायावर उभे राहण्याची शिक्षा देत. कांही जमीनीवर डोके टेकून उलटे उभे राहण्यास सांगत. अशा प्रकारची शिष्यांना दिलेली वागणूक माझ्या बाबतीत कठीण आहे. प्रत्येक वेळी वाटणारी अनुकंपा माझ्या डोळयातून अश्रु रुपाने प्रकट होते. कांही वेळेला मी अशा रितीने सांगते कीं मी तुमच्यावर रागावलेले वाटावे पण एकाच वेळी गुरु व माता असणे ही मोठी कठीण गोष्ट आहे. प्रत्येक मातेला आपला पुत्र उत्तम निपजावा असे वाटते. पवित्र मातेला आपला पुत्र सुध्दा पवित्र असावा असे वाटते.

पहिली बाब म्हणजे पवित्रता, आणि या करिता तुम्ही कोणावर जबरदस्ती कशी करुं शकाल ? तुमच्यात पवित्रता येऊ शकत नसेल तर तुमचे उत्थान कसे होईल. कोणत्या शिस्तीच्या आचरणाने माणसाला पवित्रता लाभेल. तुम्ही कसे भाग पाडाल कोठल्या कारणाने तुम्ही रागावणार? यासाठीं मी सहसा एकच करते ते म्हणजे मी क्षमा करते.

क्षमाशिलता हा एक शिकवणूकीसाठी उत्तम मार्ग आहे. जेंव्हा त्यांना आपली चूक उमगते व ते ती कबूल करतात तेंव्हा क्षमा ही केलीच पाहिजे. एकदा एका गृहस्थाने श्री बुध्दांना अजाणतेपणाने अपशब्द वापरले सर्व बोलून झाल्यावर जेंव्हा त्याला ते बुध्द आहेत हे समजले तेंव्हा धडकी भरली त्याने बुध्दांकडे क्षमा याचना केली. तेव्हा श्री बुध्दाने त्याला विचारले हे केंव्हां घडले ? त्याने उत्तर दिले "काल" श्री बुध्द उत्तरले 'काल' मला माहीत नाही मला फक्त 'आज' कळतो. तुमची उदात्तता जाणा व तुमच्यातील उदारता लोकांवर निश्चितच परिणाम कारक ठरेल हे जे घडते ते भांडणातून, झगडण्यातून किंवा कठोर बोलण्याने होत नाही. गुरु आपल्या शिष्यांना फारच धाकात ठेवित, त्यांना पहाटे ४ वाजता उठून ध्यानाला बसावे लागे, जो कोणी असे बसत नसे त्याला शिक्षा करित असत. सहजयोग अगदी वेगळा आहे आमचा प्रेम शक्तीवर विश्वास आहे. ह्याच प्रेम शक्तितून तुम्ही क्षमाशिलता शिकता. आता भवसागरांत असलेले जे गुरु झाले, ज्यांनी मानवात धर्म प्रस्थापित केला, त्यांना परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागले. त्यांच्या दृष्टीने हे उच्च व उदात्त होते. लोकांना त्यांनी संतुलनात आणले कारण त्याच्या कडील ही प्रेमशक्ति, असे गुरु व त्यांचे झालेले अवतार हे संतुलीत होते त्यांनी ह्या ईश्वरीप्रेमाची स्तुती केली.

ज्या वेळी आपण साक्षात्कारा विषयी म्हणतो त्यावेळी प्रथमतः स्वतःबद्दल धीर राखणे ही महत्वाची बाब आहे. मला माहित आहे कीं धीर धरणें हे काहिना चांगले वाटत नाही. काही अजुनही आजारी पडतात, काहीना व्हायब्रेशनस्ची जाणीव होत नाही, तर थोडा धीर धरला पाहिजे. ज्या वेळी तुम्ही स्वतःचे गुरु बनता, आणि गुरुला स्वतःच्या शिष्याबद्दल धीर असतो तसा तुम्हाला स्वतःबद्दल असायला हवा. या धीर धरण्यामुळे आपण अनेक गोष्टी कोणतीही समस्या न उद्‌भवता सहन करु शकतो हे आपल्याला समजेल. एखादी व्यक्ति जेव्हा मी चांगला नाही असे म्हणू लागते तेव्हां त्याच्यात सोशिकता नाही असे समजावे. ज्या वेळी तुमच्यात सोशिकता येते तेव्हां तुम्ही सर्व काही स्विकारु शकता. तुम्ही कोठेही असा तुम्ही स्वतःतच मग्न असता कारण तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहात. पहिली गोष्ट म्हणजे रागवू नका व कुरकुर करु नका. आनंदी रहा, तुम्ही गवतावर झोपू शकता, अथवा गादीवर किंवा दगडावरही झोपू शकता आणि झोपला नाहीत तरीही बिघडत नाही. त्याने काहीं फरक पडत नाही.

लोकाच्यांत सोशिकता नसते कारण त्यांची डावी विशुध्दी. उदा. कॅथॉलीक पंथी इत्यादी. यामुळे तुम्हांला स्वतःबद्दल व स्वतःच्या त्रासाबद्दल, दुःखाबद्दल कीव वाटू लागते व तुम्हीच स्वतःला दोषी समजू लागता. तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहात. तुम्हाला हे करण्याची जरुर काय जसे एखाद्या बुडणाऱ्या व्यक्तिला वाचवले जाते तो किनाऱ्यावर परत येतो व त्याला दुसरा जन्म लाभतो. पण तेच दुःख तो आठवून दुःख करित बसला तर त्याला काय अर्थ ? तर तुम्ही स्वतःच जागे व्हा व स्वतःला सांगा की "मी" तो पूर्विचा नाही, "तो मी" नाही, आता दुसराच आहे पुर्विचा तो मी नाही, तुम्ही स्वतःला बजावून सांगा कीं मी स्वतःचा कधीही उपमर्द करणार नाही, कारण तुम्हाला आत्मसाक्षात्काराचा अधिकार आहे आणि तो मिळाला आहे.

या सर्व पूर्व संस्कारांमुळे तुम्ही आनंद उपभोगु शकत नाही. दुःखी अवस्था ही एक फॅशनेबल गोष्ट समजली जाते विषेशतः पाश्चात्य देशात हाल नसणें हीच गोष्ट कांही लोकांना दुःखी करते. असे लोक जे गतकालाच्या काल्पनिक, अस्तित्वात नसलेल्या दुःखात अडकतात ते वास्तवातील आनंद भोगू शकत नाहीत. सहज योग्यांना त्यांच्या अंतःकरणात आनंद असणें हे महत्वाचे आहे. खर तर हा आनंदाचा सागर सतत तुमच्यात असून तो तुम्हाला आशिर्वाद देत असतो. त्यातील काहीं थेंब जरी तुमच्या आत ओघळले तर तो एक सुखद अनुभव आहे. तुमच्या आंतच याची प्रतिक्षा होत असते. असे लोक दुसऱ्याला कष्टी पाहू शकत नाहीत . ते स्वतः पूर्णपणे आनंदी असतात व भोवती आनंदच पसरवितात छोटया छोटया गोष्टीतही ते आनंद घेतात तुम्ही आनंदाचे सागर होता आणि त्यात एखादी गोष्ट घडते तेव्हा निर्माण होणारे तरंग ही सुखद असतात. त्या तुमच्याच नव्हे तर दुसऱ्यांच्याही अंतरंगापर्यंत पोहोचतात. छोटया छोटया गोष्टीही

तुम्हाला आनंद देतात.आणि तुम्ही जणू एक त्या प्रेमाचा रम्य सागर होता.प्रेमातून आनंद निर्माण होतो.हे प्रेम अहिक नाही तर परमेश्वरी प्रेम आहे.

सहजयोगी म्हणून वा गुरु म्हणून स्वत:वरच प्रेम करणे व स्वत:च्या जीवनाचा.अर्थ लावणे जरुरीचे आहे.मला वाटते सहजयोग्यांनी स्वत:ला नीट ओळखले नाही.जगातले किती लोक आत्मसाक्षात्कार देऊ शकतात? कुंडलिनी विषयी किती लोक जाणतात ? असे नेहमी उत्थान पावत असलेले लोक किती जणांनी पाहिले? तुम्ही एवढे शक्तिमान आहांत की नुसत्या दृष्टीक्षेपाने दुस-यांना पार करु शकता. सामान्यत: प्रेमात लोकांना त्यांची प्रिय व्यक्ति दूर जाईल अशी भिती वाटते. पण तुमच्या बाबतीत, तुम्ही तुमच्या बरोबरच आहात व तुम्हाला संरक्षण आहे. पण क्षणभर जरी तुमचे लक्ष/चित्त विचलित झाले तर लगेच तुमच्या लक्षात येईल कीं आपण चुकत आहोत. 'स्व' मुळे तुम्ही स्वत:ला सावरु शकता.जेव्हा तुम्हाला शारिरीक त्रास होतात तेव्हा लगेच ते तुम्हाला कां होतात हे समजते.तुम्हाला ते कसे बरे करायचे हे माहीत आहे.तरीही प्रत्येकाने संतुलनात राहीले पाहिजे.तुमचे संतूलन जर बिघडले तर तुम्हाला व्हायब्रेशनस् जाणवणार नाहीत व तुम्हाला काय होत आहे हे ही समजणार नाही.योग्य मार्गावर आहोत की नाही का आपला न्हास होतोय हे कळणार नाही. सर्व सहजयोग्यामध्ये हा समतोल असणे जरुरीचे आहे.आपण अजूनही भूतकाळ व भविष्य काळाबद्दल विचार करतो आणि त्या मुळें हे असंतूलन आपल्यात येते.जर सर्व देवदूत व गण तुमच्यासाठी झटतात तर तुम्हाला कशाची चिंता.बस् तुम्ही फक्त हुकूम सोडा.एखाद्या भिका-याला राजा बनवून सिंहासनावर बसवण्यासारखे आहे. त्याचे पुढे जो कोणी येऊन झुकतो त्याच्या जवळ तो एक रुपया मागतो.

सहज योगातील लोकांना सुध्दा असंतूलन येते. कसे ? तर जे लोक भौतिकातील कायद्याना घाबरतात, त्यांच्या सभोवार फार मोठी शक्ति कार्यरत आहे हे ज्यांना माहीत नाही. तुम्हाला कोणी थांबवू शकत नाही किंवा आडकाठी आणू शकत नाही. तुम्ही ज्या वेळी शंका घेऊ लागता, जेव्हा तुम्ही "पण-परंतू" करु लागता त्यावेळी परमेश्वरी कायदा उपयोगी पडत नाही एरवी तुम्हाला कोणी काही करु शकत नाही तुम्हाला पूर्ण संरक्षण असते.

जुन्या गुरुंच्या प्रणालित व आधुनिक गुरुंच्या प्रणालीत मुख्य फरक म्हणजे, जुने गुरु म्हणत तुम्ही त्रास सोसला पाहिजे व ते जे सांगतील ते स्विकारले पाहिजे आधुनिक गुरु तसे नाहीत कारण आता तुमची आईच येथे आहे.तुम्हांला हात लावायची कोणाची हिंमत आहे.मी हे सांगते त्यावर तुम्ही विश्वास ठेवला पाहिजे.ही श्रध्दा तुमच्यात हवी. आतां पर्यंत कोणालाही आदिशक्ति गुरु म्हणून लाभली नव्हती. आदिशक्तिला सर्व देवाच्या शक्त्या प्राप्त आहेत. तर मग तुम्हाला कोण त्रास देणार अथवा इजा करणार. त्रास करुन घेणार असाल तो तुम्ही स्वत:च स्वत:ला. इतर गुरुंच्या शिष्यात व तुमच्यात फार मोठा फरक आहे तो म्हणजे तुम्हाला कोणताही त्रास सोसावा लागत नाही. आणि जर कोणाला त्रास झालाच तर त्याच्यांत 'निगेटिव्हीटीज्' असाव्यात असे समजावे.जे सहज योगी अगुरुंकडे गेले होते ते अपघातात सापडले किंवा काहीतरी भयंकर घडले, पण ते एकदम त्यातून बाहेर पडतात.त्यांच्यात कोठूनतरी किंवा त्यांच्या नातलगांची बाधा उतरली असेल.पण तुम्ही त्यातून मुक्त व्हाल. सहज योगातील लोकांनाही पकड येते हे विशेष वाटते तरी तुम्ही लोकांना जागृती देऊ शकता. तुमच्या कोठल्याही समस्या असोत तुम्ही तुमचे हात चालवा, कुंडलिनी वर चढेल व ती तीचे कार्य करेल.जर तुम्ही सहज योगाची साधना (ध्यान धारणा) केली नाहीत किंवा लोकांना जागृती दिली नाहीत तर ते सर्व गंजून जाईल व मोडीत निघेल. जर तुम्ही तुमचे वाहन वापरले नाहीत तर ते गंजून जाईल, म्हणून सर्वांनी लोकांना जागृती दिली पाहिजे मग ती स्त्री असो वा पुरुष.तुम्ही कोणत्याही देशाचे असा तुमच्यातील शक्ति कार्यान्वित ठेऊन तुम्ही ती वाढविली पाहिजे नाहीतर तुम्ही गुदमरुन जाल.मला कांहि चांगले सहजयोगी माहीत आहेत कीं जे माझी पूजा करतात पण तरीही त्यांना संधिवात किंवा इतर त्रास आहे. तुमची शक्ती दुस-यांना जागृती देण्यासाठी वापरली पाहिजे. जर तुम्हाला आचारसंहिता

समजली नसेल ठिक आहे तुम्हाला क्षमा केली जाईल. अजाणतेपणाने कांहि केले असेल तर ठीक पण जाणून बुजून एखादी गोष्ट कराल तर कोठल्या अवस्थेला तुम्ही पोहोचाल हे ठाऊक नाही. जर तुम्ही सुरक्षित क्षेत्रांत/प्रांतात असाल तर ठीक पण त्याच्या बाहेर जाल तर असे अनेक विरोधी प्रवाह आहेत, ते तुम्हाला खेचून नेतील. तर ती सहजयोगांची चूक नाही.

सहजयोगातील अथवा सहजयोग्यातील दोष काढणे ही दुसरी चूक. समजा एखाद्या गुरुचे दहा शिष्य आहेत आणि एकाची जरी तक्रार आली तर गुरु म्हणेल व्हा बाहेर. कोणालाही तक्रार करण्याची जरुरी नाही. समजा एक हात दुखत असला तर दुसरा हात मेंदुला तक्रार करत नाही. तर उलट त्याला शांत करण्याचा प्रयत्न करील. सहजयोगी गुरु आहेत. ते एक समूह आहेत जसे ज्ञानेश्वरांनी वर्णन केल्याप्रमाणे कल्पवृक्षांचे वन! जे लोकांना आवडेल व पाहिजे आहे ते प्राप्त करुन देतील. ते म्हणतात तुम्ही सागरासारखे वाहता व ईश्वरा विषयी बोलता. तुम्ही त्या समूहात आहात व सामुहिकतेत एकत्र एकाच जाणिवेने चालता. असा सामुहिकतेतला शक्तिमान समूह जणू तो लोकांसाठी अमृत आणतो.

या सामुहिकतेच्या शक्तिची जाणीव होणे ही तुमची पहिली परिक्षा आहे. जे सामुहिकतेत राहू शकत नाहीत ते सहजयोगी नाहीत. जे कांही सहजयोगी माझी सेवा करतात, माझी काळजी घेतात, माझी पूजा करतात ते दुस-यावर ओरडणे, त्यांना शिक्षा करणें, अथवा ओरडून काम सांगणे हा त्यांचा अधिकार समजतात, पण तसे कांही नाही. तुम्ही सहजयोगी आहात आणि सामुहिकतेशी पूर्णपणे निगडीत आहांत. जे अलग आहेत ते सहजयोगी नाहीत. तुमचे पूर्वकालांतील संस्कार व अहंकार तुम्हाला दुस-या पासून अलग ठेवतील तर ईश्वरीतत्वा पासूनही तुमचा संपर्क नाहीसा होईल. जे सामुहिकतेत नाहीत त्याचा (सहजयोगांशी) काय संबंध.

तुम्हाला पार करताना अनेक सूक्ष्म तत्वाविषयी मी सहज बोलू शकते यांचे आश्चर्य वाटते. या सुक्ष्मतेत एक सौंदर्य आहे, ते प्रकट करण्यात, विचारांत, आचारात व ते समजण्यात किती रम्य आहे. सामुहिकतेची जाणिव म्हणजे धान्याच्या राशीतील एका दाण्याप्रमाणे वाटते जसे थेंबाचे सागरात सामावणे. समजा एखादा थेंब म्हणेल की मी सामुहिकतेत येत नाही मी आपला काठावरच बरा तद्वत तुम्ही सामूहिकता विकसीत करुं शकत नसाल तर तूम्ही माझी भक्ति न करणें बरे.

गुरु हे सामुहिकता कशी हाताळतात. सहजयोगात तुम्ही स्वत: कोणी उच्चपदस्थ अथवा प्रतिष्ठीत आहोत असे समजू नका, आणि तुम्हाला तर असे वाटत नसेल तर त्या वेळी/स्थितीत स्पंदन आहे लक्षात घ्या. या जगात काय महत्तम आहे? काहीं नाही. सर्व एकसमान आहे. काही लोक इतके क्रुरतेने वागतात कीं त्याची कल्पनाच करवत नाही. तुम्ही जर सहजयोगी असाल तर अशा प्रकारचे असमाधान तुमच्यात असणार नाही. तुम्ही कोपिष्ठ गुरु असू शकत नाही. राग म्हणजे असंतूलन ही पकड तुमच्या कुटुंबियांची असू शकते कोठल्याही गोष्टीची आसक्ती ही तुमच्यातील असंतूलन दर्शविते. ते बांधिलकीतून मुक्त आहेत ते संतुलीत असतात, नाहीतर त्यांना सत्याचा बोध होणार नाही. आपण सहजयोगी आहोत याचा काहिंना गर्व वाटतो. सर्व जगाला वाचविण्यासाठी आपण सहजयोगी झालो आहोत असे वाटते. मी अनेक सरकारी नोकर पाहिले आहेत त्यांना सर्व आपली मिरासदारी वाटते ते नोकर आहेत पाहिजे तर त्यांना ऑफिसर्स म्हणा, सेवा देणारे ऑफिसर्स. त्याप्रमाणे आपण ईश्वरी सेवा करण्यासाठीं या जगांत आलो आहोत, आणि त्या सेवेचा हेतू म्हणजे जगाला वाचविणें. खोट्या प्रतिष्ठेच्या मागे लागून आपण हे साध्य करुं शकत नाही. तूम्ही जर असे वागाल तर तुमच्या जवळ कोणी येणार नाही.

तुम्ही कोणाचाही व्देष करुं शकत नाही कारण व्देष म्हणजे तुम्ही स्वत:लाच इजा पोहोचवता. जनावरात हे असूं शकते. व्देष करण्याचे कारणच काय. तुम्ही आता साक्षात्कारी

आत्मे आहात.तुम्ही कशाला दुस-याचा व्देष कराल ? समजा तुमच्यासारखा एक हिरा दुस-या हि-या शेजारी ठेवाल तर दोघांचे मिळून अधिक तेज वाढते.समजा एखादी बिघडलेली व्यक्ति असेल आणि तुम्ही अधिक सोज्वळ आहात, तर तुम्ही तीचा व्देष करुं शकत नाही.समजा एखाद्या स्त्रीत चांगुलपणा असेल तर जे ती करते त्याचा मागोवा घ्या.ती चांगली कां आहे याचा अभ्यास करा. जेव्हां सहजयोगी दुस-या विषयी आपले विचार व्यक्त करतात त्यावेळी मोठी मजा वाटते. विशेषत: ते दुस-यातील चांगुलपणा व मोठेपणा बघतात आणि हे बघता बघता तुम्ही स्वत:ला घडवता.जेव्हा तुमच्यात व्देष डोकावतो तेव्हा तुम्ही स्वत:चा निष्कारण धि:कार करता. एखाद्याचे केस काळे आहेत किंवा पांढरे आहेत इत्यादी. तुमच्यातील संबंधात व्देषाचे कांही कारण नाही कारण तो तुमचा आनंद नष्ट करतो, म्हणून तुम्ही भिती, व्देष, खोटी प्रतिष्ठा व अधिरता/उथळपणा या दुर्गुणा पासून मुक्त व्हा.

गुरुची दुसरी पध्दत म्हणजे जे स्वत: अत्यंत सोशिक, व राग विरहीत असतात व लोकांना काहिही न सांगता स्वत:च शिस्तीचे पालन करतात. सहजयोगाच्या पध्दतीत खूप शिष्य असतात.ज्ञानेश्वरांच्या काळापर्यंत एकच शिष्य असे.काही काही गुरुना तर कधीच एकही शिष्य नव्हता. कारण त्यांना कोणी बोलण्यास अगर त्यांना समजून घेण्यास योग्य असा वाटला नाही.परंतू सहजयोग्यांचे तसे नाही तुम्ही थोर आहांत आपण संख्येने बरेच आहोत.आपण एकमेकांना समजू शकतो व एकमेकांना माहित आहोत.आपणा सर्वांना कुंडलीनी शक्ति बद्दल माहीत आहे, व आपल्याला तशी जाणिव आहे.आपण या जगात काय चालले आहे ते जाणतो. आपण हिमालयातील गुहेत देवाचे नांव घेत बसलेले नसून जगातील वास्तवात आहोत.आपण पलायनवादी नाही.आपण रोज अनेक समस्याना तोंड देतो.आम्ही वास्तवात तर ते अज्ञानांत आहेत; आणि म्हणून आम्हाला समस्या कळते व तीचे निराकरण करुं शकतो.आता फक्त तुमच्या शक्तिचा प्रयोग तुम्ही मानवतेवर करायचा आहे.

तुम्ही ज्ञानाचे संचय आहात हे तुम्हाला माहिती असले पाहिजे.तर अशा ज्ञानाच्या स्त्रोताकडे तुम्ही प्रवृत्त व्हा. उदाहरणार्थ.प्रत्येक गोष्टीचा सहज योगाच्या भाषेतून अर्थ लावू शकता जे-जे काहीं तुमच्या दृष्टीस पडेल त्याची सहजयोगा बरोबर तुलना करा. त्यामुळे तुमचा आनंद व्दिगुणित होईल.हे महत्वाचे आहे.एकदा मी एका ठिकाणाहून परत येत असता मला अतिशय घाम आला, त्यावेळी माझ्याबरोबरे असणारे एक सहजयोगी म्हणाले 'माताजी या जागेच्या उष्णतेचा त्रास तुम्हाला होतोय.सहजयोगीच हे पाहूं शकतात.इतर सर्वजण माझ्यातील चैतन्यामुळे त्यांना थंड व सुखावह वाटत होते पण मी मात्र हातातील पंख्याने वारा घेत होते.तर मी सर्व उष्णता शोषून घेते आणि तुम्हाला शीतलता देते. ते माझे काम आहे, की प्रत्येकातील उष्णता शोषून घेते व त्याचे सुखद शितलतेत रुपांतर करते काही लोक ओरडतात, किंचाळतात, तुम्ही त्यांच्यावर पाणि टाका, त्यांच्यातील उष्णता काढून टाकली जाईल. हे शोषून घेणे महत्वाच आहे. त्या शोषीकतेला भिऊ नका, फक्त एकच काळजी घ्या.ती म्हणजे 'बंधन.' लक्षात घ्या आपण सहजयोगी आहोत. ज्यावेळी ही जाण येते त्यावेळी ही प्रवृत्ती तुमच्यांत बळावेल विल्यम ब्लेकच्या बाबतीत असे झाले, म्हणजे कल्पनेच्या राज्यात असतांना ते ज्ञानाच्या बिंदू पाशी पोहोचले. जे काही तुम्ही पाहता किंवा दुसरे करतात त्याचा सहजयोगाशी संबंध लावण्याची प्रवृत्ती ठेवा, तुम्ही सुध्दा त्या प्रेमाच्या एका अंशाला पोहोचाल.

आपण साक्षात्कारी आत्मे आहोत हे तुम्ही विसरता निदान स्वत:चे रक्षण करण्यासाठी आपल्या चैतन्य शक्तिचा उपयोग करा.कारण तुमच्या शेजारीच विरोधी शक्ति असतात. आपण सहजयोगी आहोत हे कधीही विसरु नका. आचार संहिता तयार करा, शिस्त पाळा मग दुस-यावर प्रेम कसे करावे हे समजेल. हा गाभा आहे. स्वत:बद्दल आत्मविश्वास बाळगा आणि मग तुम्ही सुरक्षित असाल. आपण सतत सहजयोगी आहोत अशी स्थिती प्राप्त करा.अशा त-हेने तुम्ही स्वत:चे गुरु व्हा व दुस-याचेही. ईश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

* * *

# देवी पूजा (सारांश)

## - ताग्लीअॅटी (रशिया)

## ३ ऑगस्ट १९९३ -

तुमच्या ह्रदयात असलेल्या प्रेम शक्तिने तुमचे संरक्षण केल्याचे कितीतरी चमत्कार तुमच्या अनुभवास आले असतील. जे अत्यंत संतापी व रागीट लोक आहेत व जे दुसऱ्यांना सतत त्रास देत आले आहेत, असे लोक अत्यंत सुंदर व छान झालेले मी पाहिले आहेत. या प्रेमाच्या प्रकाशांत तुम्ही स्वत:वर प्रेम करता आणि त्याच प्रकाशांत जे चुकीचे व नितीमत्तेला सोडून आहे ते सोडून देता. हे प्रेम चिरंतन आणि खूप शक्तिशाली आहे, आणि ते तुम्हाला आत्मविश्वास देते कारण आत्मा सर्व शक्तिंना प्रकाशित करतो व तो सामुहिकतेचा व विश्वबंधुत्वाचा स्त्रोत आहे. जेव्हा तुमचे चित्त, संकटात सापडलेल्या, मदतीची गरज असणाऱ्या लोकांकडे जाते तेव्हा या प्रकाशित चित्तामुळे तुम्ही त्यांचे प्रश्न, समस्या घर बसल्या सोडवू शकता. अशा लोकांना शब्दाची, शस्त्रांची किंवा सिमांची गरज नसते. जर रशियन लोक भारतात गेले तर त्यांना स्वत:च्या देशांत आल्यासारखे वाटेल किंवा जर भारतीय लोक रशियांत गेले तर त्यांना स्वत:च्या देशात आल्या सारखे वाटेल. मग भांडणार कोण? तुमच्यापैकी कोणीही जास्त सामर्थ्यवान आहे असे म्हणणार नाही, कारण प्रत्येक जण हा एकमेकांच्या अस्तित्वाचा घटक असेल. हा फार विशेष काळ आहे, मी याला बहराचा काळ म्हणते, जेथे सत्याचा शोध घेणारी कितीतरी फुले उमलली आहेत. त्या सर्वांना आता फळे व्हायचे आहे. ते होणार आहे. हा काळ फार महत्वाचा आहे. सर्व धर्मांमध्ये ते सांगीतलेले आहे.

तो दुसऱ्या धर्माचा आहे म्हणून आपण कोणाचाही व्देष करीत नाही, त्या उलट आपण सर्व धर्म समभाव ठेवतो. या शक्तिमुळेच थेंबाचा समुद्र आणि मनुष्य सामुहिक बनतो. तुमच्याकडे असलेल्या सर्व शक्ती या परमचैतन्याने प्रकाशित झाल्या आहेत. त्यामुळे ती परमचैतन्य शक्ति परिवर्तन घडविते आणि प्रत्येक गोष्ट अत्यंत सुंदर व नाजुकपणे हाताळते. फक्त या शक्तीवर (परमचैतन्य) विश्वास ठेवण्याची गरज आहे. फक्त इतरांबद्दल प्रेम पाहिजे आणि हे प्रकाशित प्रेम तुम्हाला हवे ते मिळवून देईल आणि हीच परमचैतन्य शक्ति होय. त्या बद्दल अजिबात शंका नाही. आपल्याला ते खुल्या मनाने स्विकारले पाहिजे आणि आपल्याला त्याची जाणिव होते, आपण एक श्रेष्ठ व्यक्तिमत्व बनतो. तिथे अजिबात स्पर्धा, महत्वाकांक्षा आणि मत्सर नाही, फक्त एकच इच्छा उरते ती म्हणजे मला आनंद मिळतो आहे, इतरानांही तो मिळू दे ! सहजयोगाचा प्रसार करण्यासाठी लोक झटत आहेत. ते खूप कष्ट करतात, थोडे पैसे घेऊन प्रवास करतात, ते लोकांना सहजयोग पटविण्याचा प्रयत्न करतात, कोणत्याही भौतिक फायद्याची अपेक्षा न ठेवता अनेक गोष्टी करतात. पण जेव्हा तुम्ही दुसऱ्याच्या कुंडलिनीचे उत्थान करता व त्याला आत्मसाक्षात्कार देता तेव्हा अतीव आनंद मिळतो.

॥ ईश्वर तुम्हाला आशिर्वादीत करो ॥

# श्री गणेश पूजा
## कबेला, इटली ११।९।९३
## - भाषणाचा सारांश -

आज आपण श्री गणेश पुजेसाटी इथे जमलो आहोत. श्री आदिशक्तिने निर्माण केलेली पहिली देवता म्हणजे श्री गणेश मूल तत्त्वांची ही पहिली देवता निर्माण करणे आवश्यक होते कारण मानवी जीवना पर्यंत निर्माण झालेल्या सर्व जिवंत क्रिया या मूलभूत शक्तिव्दारातूनच आल्या, त्याच्या शिवाय कुठलीही निर्मिती शक्य नाही. पदार्थ विज्ञानातील सल्फर डायॉक्साइड आता पहा. तुम्ही त्याच्या मुळापर्यंत जाल तर तो परमाणू आहे हे कळेल. मग त्यामध्ये सल्फर आणि ऑक्सिजन हे घटक (अणू) एका विशिष्ट गतीत फिरताना दिसतील. या तीन प्रकारच्या गती आहेत.

प्रत्येक पदार्थाच्या परमाणूमध्यें कार्यरत असणारी शक्ति आहे. आता कोणी म्हणेल ही शक्ति कशाला हवी? ही शक्ति नसेल तर वेगवेगळ्या घटकापासून वेगवेगळे पदार्थ कसें बनणार? त्यांना गती कोठून मिळणार? उदाहरणार्थ पहा., कीं सोडियम आणि क्लोराइड एकत्र असताना त्यातील फक्त क्लोराइडचा घटक दुसऱ्या घटकाला जाऊन मिळतो तेव्हां त्याला ही गती कोठून मिळते? म्हणजे त्या परमाणूमध्येंच एक शक्तिच अंतर्भूत असायला हवी. पाण्यात अशी शक्ति आहे म्हणूनच पाण्यापासून तऱ्हतऱ्हेच्या यांत्रिक क्रिया केलेल्या आपण जाणतो. तसेच अगदी दगड, सोने इत्यादी सर्व पदार्थात ही शक्ति आहे,आणि हा सर्व श्री गणेशांच्या शक्तिचा अविष्कार आहे.अगदी लहान बालका सारखे असूनही त्यांची शक्ति किती प्रभावी आहे, आणि ती सर्वकाळ कार्यरत आहे. पदार्थापासून, वनस्पती, प्राणी, मानव अशी सर्व ठिकाणी ही शक्ति कार्यरत आहे.

पदार्थ विज्ञानांत आपण ज्याला विद्युत्-चुंबक शक्ति म्हणतो त्याच्या मुळाशी श्री गणेशांची ही शक्तिच अंतर्भूत आहे. ही शक्ति कार्य करुं लागली म्हणजेच वेगवेगळया तऱ्हेने, वेगवेगळया स्तरांवर उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये तिचा आविष्कार होतो.

मनुष्य प्राण्यांत श्री गणेश मांगल्य, पावित्र्य व अबाधिता या गुणातून व्यक्त होतात. अबोधिता ही फार कार्यशाली शक्ति आहे. अबोधिता म्हणजे अज्ञान नव्हे. तुम्ही जेव्हा अबोधित होता तेव्हां खऱ्या प्रेमाशिवाय तुम्हाला कुठलाच भाव महत्वाचा वाटणार नाही. किंवा असं म्हणां कीं अहंकार आणि कंडिशनिंग (संस्कार) नसलेला माणूस जेव्हा अबोधित होतो तेव्हां त्याचे सर्व संबंध प्रेमातूनच होतात. मात्र त्याला पैसा, सत्ता इत्यादी गोष्टींची गरज भासत नाही. अशा व्यक्तिला दुसऱ्या माणसाचं फक्त प्रेमच कळतं आणि विशेष म्हणजे या प्रेमातून त्याला इतर काहीही साधायचं, मिळवायचं नसत. तो प्रेम घेतो आणि प्रेमच देतो. बस् ! सर्व धर्मांचं पायाभूत तत्त्व हे प्रेमच आहे. जो पर्यंत तुमच्यांत अबोधिता येणार नाही तो पर्यंत तुम्हाला धर्म म्हणजे काय हे समजणार नाही. एरवी आपण एकाद्याला धार्मिक म्हणतो, त्याला एक मनाची भावना, धर्माभिमान, विशिष्ट धर्मात जन्म झाला किंवा कोणीतरी त्या धर्माबद्दल सांगीतल म्हणून असे वेगवेगळे अर्थ होंऊ शकतात. पण सर्व वरवरच असतं. जो पर्यंत ही अबोधिता तुमच्यात पूर्णपणें उतरत नाही तो पर्यंत तुमच्या धर्माला अर्थ नाही. अबोधित झालांत कीं खऱ्या अर्थाने धार्मिक व्हाल. मग तुम्ही सर्व वादांच्या पलीकडे जाल. तुम्ही अधर्मी बनू शकणारच नाहीत. मग या अबोधिततें पासून नितिमत्ता अविष्कार घेते. एकदां श्री गणेश जागृत झाले आणि तुम्ही त्यांचा आदर

केलात कीं तुम्हीही नितिमान होता. मला काहिंच सांगायची, बोलायची जरुरी नाही. तुम्ही तसे सहजच होणार. मागच्या आज्ञेवरील श्री गणेश आणि पुढील आज्ञेवरील येशू ख्रिस्त - जे गणेशांचेच अवतार आहेत त्यांच्याच प्रकाशांत (कृपेत) हे सर्व होते आहे. पाश्चिमात्य लोकांना येशू-ख्रिस्त हे (स्पिरीट) आहेत हे कधी समजलच नाही. त्यांनी येशूंना फार त्रास दिला, अपशब्द बोलले, छळलं तरीही त्यांनी लोकांना क्षमाच केली.

श्री गणेशांचा मुख्य स्वभाव विषेश म्हणजे ते आपल्या आईचा खूप आदर करीत. मातृत्व ही एक महत्वाची गोष्ट आहे. स्त्रियां, पुरुष, मुलं या सर्वां मधील मातृत्वाची भावना ही कुटुंबाची आणि समाजाची आधार शिला आहे. सर्व साधारण माणसाचं (साधा व प्रामाणिक माणूस) दैनंदिन जीवन आईशी निगडीत असतं. पण माता या खऱ्या अर्थानं माता व्हायला/असायला हव्यांत. श्री गणेश आदीशक्तिच आपली आई आहे हे जाणतात आणि तिच्यापुढे ते पूर्ण शरण असतात. ते आणखी कोणाला ओळखत नाहीत. सहजयोगात ही महत्वाची गोष्ट आहे. एरवी नितीभ्रष्ट लोक आहेतच ते नितीमत्तेच्या विरुध्द चुकीचे आचरण करतात. अशाने ते आदिशक्तिच्या विरुध्द पाप करतात. एकवेळ श्री गणेशांच्या विरोधात वागलात तर ते क्षमा करतील, पण आदिशक्तिच्या विरुध्द वागलात तर ते शिक्षाच करणार. आदिशक्ति स्वत: शिक्षा करत नाही, देवताच शिक्षा करतात.

सर्व प्रथम महत्वाची गोष्ट लक्षात ठेवायला हवी कीं अबोधितेच्या आपण आदर केला पाहिजे, तिला जपल पाहिजे, तिची काळजी घेऊन ती विकसीत केली पाहिजे, म्हणून मी मुलांच्या बाबतीत फार दक्ष असते. मुलांना उठसूठ वर्तमानपत्रांची सवंय लावू नये. त्यांचे फोटो जाहिरातीकरितां वापरूं नयेत. लहान सहान् गोष्टी मधून पैसा मिळविण्याचा सवयी लागणार नाहीत याची खबरदारी घ्यावी कारण अशा वृत्तीमधून मुल्यवान अश्या या अबोधिततेचा आपण व्यवहार करायला लागू, जी मुलांमध्ये अगदी स्वाभाविक आहे. जाहिराती करिता उपयोग करुन घेतलेली पुष्कळ मुलं दगावल्याच मला माहित आहे. आपण मुलांना खूप काळजी पूर्वक जपलं पाहिजे. पण आपण कधी कधी दुसऱ्या टोकाला जातो. कांहि लोक आपल्या मुलांच्या बाबतीतच सदैव काळजीत असतात, त्यांना थोडासा जरी त्रास झाला तर ते लगेच अस्वस्थ होतात. याचा अर्थ तो तुमचा मुलगा आहे म्हणून असं वागता त्याचा आदर करता, पण तसेच त्याच्यामधील अबोधिततेचा आदर केला तर तसाच आदर व समजूतदारपणा इतर सर्व मुलांबद्दल तुम्ही दाखवू शकाल. त्याच बोलणं-चालणं-वागणं पण समजू शकाल. सुदैवाने तुम्हांला अशी मुलं आहेत, जी जन्मत:च जागृत आहेत. ही फार मोठी गोष्ट आहे. भाग्याची गोष्ट आहे. ती किती अबोध-निरागस आहेत ते बघा- अशाच एका मुलाच्या वडिलांना हॉस्पिटल मध्ये नेत असताना तो सहज म्हणाला "ते तिथे कसे बरे होणार ? तिथे कोणी सहजयोगी नाहीत मग त्यांची चक्रे कोण ठिक करणार ? त्यांना श्री माताजींकडे न्या." त्यांना बरोबर सत्य तेच समजतं कारण अबोधित असल्यामुळे त्याचं चित्त शुध्द असतं. खरं म्हणजे प्रत्येक कार्यामध्ये - संगीत - कला वगैरे सुध्दा. तुमच चित्त शुध्द असलं पाहिजे. ते अबोधित झाल्यावर होतं. आता एकादा कलाकार फक्त पैश्याच्या मागे लागला तर त्याच्याकडून अमर कलाकृती निर्माण होणार नाही. अशा प्रकारची कला निर्माण होते आणि विसरली जाते. ती चिरंतन टिकत नाही. तिच गोष्ट सध्याच्या संगीताची, आधुनिक समजल्या जाणाऱ्या संगीतात पैशाची दृष्टी येते आणि मग निर्माण झालेली कला परिपूर्ण होत नाही.

पूर्विच्या काळी ईश्वरार्पण म्हणून केलेल्या सर्व कलानिर्मितीबद्दल आपल्याला आजही अभिमान वाटतो. कदाचित् त्या वेळेच्या कलाकारांना खूप त्रास झाला असेल. पण त्यांची पूर्ण श्रध्दा होती कीं आपण ईश्वरांच काम करत आहोत तेव्हां ते काम-निर्मिती- उत्कृष्ट व जीव ओतून व्हायला हवी. सर्व प्रामाणिक कलाकारांना सत्यासाठी झगडा करावा लागला. अबोधिता तुम्हाला स्वत:ला समजून घेण्याची शक्ति देते, तुम्ही किती उन्नत आहात हे तुम्हालाच समजते. अबोधित माणूस आपण सद्गुणांच्या वरच्या पातळीवर आहोत हे जाणतो. त्याने व्यवहारांतल्या फालतू गोष्टीं ज्या फारच प्रसिध्द आहेत व फॅशनेबल आहेत अशांना मुळीच थारा देऊ नये. एरवी आपण स्वत:ची अबोधिता फुकट कां दवडायची ? आपलं ध्येय काय ? काही व्यक्ती खूप हुशार असतात आणि ते त्यांच्या हुशारीचे प्रदर्शन करतात. अशा लोकांना कोणी मान देत नाही. आजकाल लोकांमधील या अबोधितेवर जणूं हल्ला होत आहे. प्रथम लहान मुलं बळी पडतात त्यांना नांव ठेवली जातात हे सर्व अबोधिता नष्ट करण्याकरिता चालेले आहे. जी माणस असं करतात त्यांच्या मधे कदाचीत् अबोधिततेचा अभाव असावा, आणि मुलांमधली अबोधिता नाहीशी व्हावी असं त्यांना वाटत. हे प्रकार आजकाल फारं वाढले आहेत आणि त्याच कौतुक होत आहे कारण या अबोधितेचा त्यांना नाश करायचा आहे. फक्त मुलंच नाहीतर स्वत: अबोधित

असलेल्या माणसांवरही हा हल्ला आहे कारण जी माणसं अशा दुष्ट प्रवृत्तीच्या वाईट मार्गाने जातात त्यांना इतारांमधली ही अबोधिता पाहवत नाही, आणि असं केलं म्हणजे आपण फार मोठं काम केलं असं त्यांना वाटतं.अशा अनेक तऱ्हेने आपल्या अबोधितेवर आजकाल हल्ला होत आहे. तुमची मुलं हुशार असली, अभ्यासू असली तर त्यांना पळवून नेण्याचेही प्रयत्न होतील. अबोधित माणूस सापडला कीं त्याला त्रास द्यायचे फार प्रकार होतील. पण तुमच्या मधील अबोधिता ही फार प्रभावी शक्ति आहे जी आजूबाजूच्या द्वेष, हेवेदावे, मत्सर इत्यादी दुष्ट प्रवृत्तींना आव्हान देईल.

सर्व प्रथम आपले संस्कार अबोधितेवर मात करतात आणि तुम्हाला कर्मठ कर्मकांडात अडकवून ठेवतात. सहजयोगातही असे काही लोक अत्यंत कर्मठ आहेत. कर्मठपणा कसा तर-एकादा मंत्र तीनदा म्हणायचा म्हणजे तीनदाच असे गुंतून जातात. जे अजून बाधिक आहेत ते मला घाबरतात. मी तुम्हा सर्वांवर प्रेम करते. माझ्या पेक्षा प्रेमळ गुरु तुम्हाला सापडणार नाही. अशा लोकांकडे तुम्ही पाहिलात तर ते हंसणार नाहीत उलट घाबरतील. तुम्ही सहज योगी झालात यांत काय चुक केलीत. ते फार कर्मठ असतात. प्रत्येकाने शिष्टाचार व कर्मठपणा यातील फरक जाणून घेतला पाहिजे. अबोधित लहान मूलं शिष्टाचार जाणते.

निरागस मुलं पूजा करतात हे कर्मकांड नव्हे. ते त्यांच्या हृदयातून होत असतं. पूजा कशी करावी? प्रेम कसं व्यक्त करावं? कर्मकांडा मध्ये गुंतलेला माणूस दुसऱ्याला मारेल सुध्दा, थोडयाशा क्षुल्लक कारणावरुन जसे "तुम्ही कापूर असाच कां लावलात" वगैरे. त्यांत काहिही चूकीचे नाही. पूजा - प्रार्थना वगैरे हृदया पासून होतात, निरागसपणे होतात तेव्हा असल्या कर्मकांडाची अथवा चुकांची काळजीच करायला नको. आता तूम्ही परमेश्वराच्या राज्यात आला आहात. इथ आंता नियम बंधने नाहीत, कर्मकांड पण नाही. परंतू प्रत्येक गोष्टीला दुसरी बाजू असते तुम्ही कर्मठ बनू नका असं म्हणताना - मी एका आश्रमांत पाहिलं कीं सगळीकडे गलिच्छ पसारा, आश्रमातील लिडर्सनी मला सांगीतल कीं इथल्या सहजयोग्यांना स्वच्छतेची आवड नाही हेच जर त्यांच स्वतःच घर असल तर ते स्वच्छ ठेवतील.

तुम्हाला कल्पना आहे कीं पक्षी सैबेरियांतून ऑस्ट्रेलियात कसे जातात? ते हे कसं करतात? त्या दिशा कोण दाखवितो? तर इथे सुध्दा अबोधिताच लोहचुंबकाच सारखे काम करते. मनुष्य प्राण्यांत अबोधिता इतकी उन्नत झालेली तुम्हाला सापडणार नाही. या पक्षांना उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम या दिशा समजतात. एकादी छोटीशी मधमाशी सुध्दा जेथून आली नेमकी तेथेच परत येऊ शकते. माशांनाही दिशांचे ज्ञान आहे. मनुष्य प्राणी हरवू शकतो. तुम्ही तुमच्या कुत्र्याला पांच मैलावर सोडून या, तो बरोबर परत तुमच्याकडेच येईल. त्याला हे कसं समजत तो रस्ता कसा सापडवतो कारण त्यांच्या मध्ये अबोधितेमुळे जे गुण प्रस्थापित असतात ते खरोखर विद्युत चुंबकीय शक्ति प्रमाणे असतात आणि श्री गणेश तत्वामुळे प्रणव शक्तिही त्याचे मध्ये जागृत होते. ते स्वच्छ, सुव्यस्थित व सुजाण आहेत. परंतू ते कर्मकांडी. कर्मठ नाहीत. ईश्वराकडून त्यांना जे मिळाल त्याचा ते आदर करतात व ते कर्मकांडी पणे वागतात. मानवाने प्राणी पाळणे सुरुं केले तेथपर्यंत जरी तुम्ही पाहिल तर ते पाळीव प्राणिही इमानी / प्रेमळ असतात. त्यांना फक्त प्रेम हवं. आपल्या पाळीव कुत्र्याकडे एकाद दिवस दुर्लक्ष करा, बघा तो त्या दिवशी कांही खाणारही नाही. हे कौतुकास्पद आहे. लहान मुलांना फक्त प्रेम हवं असत हे मी पाहिलं आहे. ते प्रेमाशिवाय कांहीही स्विकारत नाहीत. पण जसजसे ते मोठे होत जातात विशेषतः या सध्याच्या भोगवादी जीवनामध्ये, त्यांची भोगवादी प्रवृत्ती उसळून येते.

मुलांमधील अबोधिता आपल्याकडून बिघडवली जाण्याचं दुसर कारण म्हणजे आपण त्यांच्या मनांवर जडवादी संस्कार करतो. आता प्रसिध्दी माध्यमातून 'टेडी बिअर' आला आहे आणि त्याचा वाढदिवसही साजरा केला जातो. आणि आई वडिलांना मुलांबरोबर खेळण्यास वेळ नसतो म्हणून ते मुलाना 'टेडी बिअर' विकत घेऊन देतात किंवा टि. व्ही. समोर बसवतात त्यांच मुळे लहान मुले सुध्दा भोगवादी होऊ लागली आहेत. आणि म्हणून ही मुले कांहीही मागू लागली आहेत त्यांच्या मागण्या बघून तुम्हाला आश्चर्यच वाटेल. एकाद्या पाश्चिमात्य मुलाला बाजारात घेऊन गेलात तर तुमचा निभाव लागणार नाही तेच एखाद्या भारतीय मुलाला घेऊन जा तो काहीही घेणार नाही. त्यांना पैसे द्या, ते एकादी लहानशी वस्तूच फक्त घेतील. असं या सध्याच्या जडवादी संस्कृतीमुळे अबोधितेचा नाश होत आहे. ती मुलंसुध्दा असले जडवादी संस्कार घेऊनच मोठी होतात. माणसाची परिक्षा ते त्याच्याकडे असणाऱ्या मोटारींच्या संख्येवरुन करतात.

मी बोस्टनला गेले होते, तेव्हा टि. व्ही. वरील एका मुलाखत घेणाऱ्याने मला विचारले कीं तुमच्याकडे किती 'रोल्स राईस' मोटारी आहेत, तेव्हा मी सांगितले कीं

माझेकडे एकही नाही तेंव्हा ते म्हणाले मग आम्हाला कांहि गम्य नाही.अशा प्रकारची प्रौंढाची मानसिक अवस्था आहे तर लहान मुलांत भौतिक गोष्टीत स्पर्धा. कालान्तराने विकणारे आणि विकत घेणारेच होतील, आणि त्यांच्या मध्ये किती कमालीची स्पर्धा असेल? तुम्ही तुमच्या मुलांच्या बाबतीत म्हणूनच खबरदार राहिलं पाहिजे.त्यांचे खूप लाड करु नका. त्यांच्या बद्दल खूप काळजी करु नका.त्यांना भोगवादी बनवू नका. या बाबतीत सर्वांनी मेहनत घेतली पाहिजे कारण आपल्याला आपल्या मुलांचा आणि त्यांच्या अबोधितेच संरक्षण करायच आहे.

आपल्या समाजातील लोकांच्या तुलनेत सहजयोगी जास्त अबोधित आहेत, ते इतके अबोधित झाले या करिता त्यांच कौतुक करायला हवं, त्यांना परमेश्वरी संगीताची जाण आहे. अशी ही अबोधिता जर वाढविली नाही तर ती गंजून जाईल व तिची वाढ खुंटेल.आजच्या काळांत दुसऱ्या पेक्षा आय.क्यू. तुमचा कमी कारण तुमचा आय.क्यू. हा जडवादी गोष्टींमध्येच वाढत आहे. तुम्ही तुमच्या अबोधितेचा प्रसार केला नाहीत तर तुमचा आय. क्यू. वाढणार नाही. हे कसं करायचं हे तुम्हाला ठाऊक आहे. हे सर्व कुंडलिनी शक्तिकडून म्हणजेच श्री गणेशाकडून होणार आहे. ते सर्व चक्रांवर तुम्हाला मदत करतात. ते जणु सर्व विद्यापीठांचे कुलगुरु आहेत आणि त्यांचाच शिक्का सगळीकडे लागतो. ते सर्वव्यापी आहेत. तुम्ही हे जाणुनच हयाचा प्रसार करणे जरुरीचे आहे.ते सामुहिकतेत आलं पाहिजे. असे होण्यासाठी आपण काय करायला हवं? तुम्ही सहज योगाचे कार्यक्रम घ्यायला हवेत, आणि त्या वेळी लोकांना तुम्ही अबोधित दिसून येईल व ते आश्चर्य चकित होतील.हे करताना तुम्ही अबोधित रहायचं विसरु नका. तुम्ही हुशारी व चलाखी दाखवू नका कारण त्यामुळे तुमचा अहंकार तुमच्या डोक्यात नविन नविन गोष्टी शिरवून टाकण्याची शक्यता आहे. तुम्ही निष्पाप-निरागसच रहा.श्री गणेशाच्या शक्तिपासून तुम्हाला तुमच्या अंतरंगात शक्तिचा स्त्रोत मिळणार आहे.यानुळे तुमचे बाहयजीवन अबोधित होईल. तुम्ही हुशारी-चलाखी न दाखविताही सर्व गोष्टी घडून येतील, कारण त्यांच्यातील आंतरिक शक्ती. म्हणून तुम्ही तुमच्या आंतरिक शक्तीच्या जोरावर अवलंबून रहा आणि त्याचा आविष्कार करा. आपल्या सर्वांच्या मध्ये अंतर्भूत असलेले श्री गणेश हेच आहेत. आपल्या सर्वांच्या नाडी-संस्था /चक्रे एकच आहेत. आपण फक्त एकच काळजी घ्यायची आहे ती म्हणजे सध्याच्या वातावरणातील वाईट गोष्टींपासून अथवा फॅशन पासून म्हणा आपली अबोधिता बिघडू द्यायची नाही. मग तुमच तुम्हालाच तीचा आविष्कार होत असल्याच दिसेल.एक साधी गोष्ट बघा, मी भारतीय आहे, मी कोण आहे हे कोणालाही माहीत नाही तरी पण मी कोटेही गेले तर विशेष म्हणजे माझ भाषण ऐकायला पांच-सहा हजार लोक हजर असतात. आपण सहजयोगी आहोत, संत आहोत.आपण लोकांशी संता सारख बोललं पाहिजे संताप्रमाणे आपण आपला विश्वास ठेवला पाहिजे. लोकांना आपण हुशारी/चलाखी पाहून आपण दुसऱ्याच कोठल्या गोष्टी साठीं हे सर्व करित आहे असे जरा सुध्दा वाटता कामा नये. एकदा कां तुम्ही तुमची अबोधिता दाखवू लागलात की सर्व देव देवता तुम्हाला मदत करतील. प्रत्येक सहजयोग्याने आपण सहज योगाचा प्रसार कसा करायचा याचाच विचार करायला हवा.

आपल्याला माहीत असलेल्या सर्व मार्गांने व पध्दतीने आपण काम केले पाहिजे पण ते काम संताना शोभेल असे असले पाहिजे.ते राजकीय पुढारी किंवा नेत्याप्रमाणें असू नये. कोणत्याही परिस्थितीत संताना मान मिळतो. तुमच्या साधेपणाने व अबोधितेचा उपयोग होतो त्याचा प्रभाव सर्वांवर पडतो.विग्रह हे असे व्यक्तिमत्व आहे ज्यात सहकार्य आहे. जी व्यक्ति अबोधित आहे व तिच्यात सहकार्याची भावना आहे अशी व्यक्ति कोणासही आवडते. तुम्ही पैशाची फार काळजी करु नका, प्रत्येक गोष्टीचे मोजमाप करुं नका, आणि उदरभरणाची काळजी वाहू नका.पण हे सर्व करताना तुमची अबोधिता व्यक्त होऊ दे.तुम्ही कोठे झोपता अगर तुम्ही काय करता यांची संता सारख्यांना काळजी नसते, त्याच त्यांना महत्व वाटत नाही. अशा प्रकारच्या जीवन पध्दतीत तुम्हाला राहिले पाहिजे कारण अबोधीताच आपले संगोपन करत, म्हणून तुम्ही रागवतही नाही अगर लोकांवर ओरडतही नाही भुतच जर समोर आलं तर ओरडणारच जसं येशू ख्रिस्तानी केलं होतं, पण एरवी तो शांत, प्रसन्न, व आनंदी, विनोदी व्यक्ति असतो.

आजच्या पुजेच्या निमीत्ताने तुम्हा सर्वांना आशिर्वाद देते किं, श्री गणेशाचे सर्व गुण त्यांचा क्रोध सोडून तुमच्यात विकसीत होऊ देत/

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

# डॉक्टर्स कॉन्फरन्स

## मॉस्को, ऑगस्ट ७, १९९३

## - भाषणाचा सारांश -

मी सहजयोगाला मेटासायन्स म्हणते कारण सहजयोगामध्ये विज्ञानांत प्रचलित असलेली पध्दत वापरत नाहीत. उदा. वैद्यक शास्त्रात जेव्हां आपल्याला एखादा शोध लावायचा असतो तेव्हा आपण काहीतरी गृहीत धरतो. आपण अशी शक्यता धरतो की एखाद्या विशिष्ट रोगाचे हेच औषध असू शकेल. हे क्षेत्र इतके विस्तृत आणि स्पेशलाइज्ड आहे की एखाद्या व्यक्तिला जर संशोधन करायचे असेल तर त्याचा ह्या विषयाचा कमीत कमी पंधरा वर्ष तरी अभ्यास पाहिजे आणि तरी सुध्दां त्याला विश्वामधे ह्या क्षेत्रात काय घडामोडी चालू आहेत त्याची पूर्ण माहिती असू शकत नाही. समजा तुम्ही असे म्हणालात कीं मला हा एक शोध लागला आहे तर कोणीतरी तुम्हाला असे सांगेल कीं हा शोध त्यांना आधिच ऑस्ट्रेलिया मधे लागलेला आहे, म्हणजे तुमचे सर्व परिश्रम वाया गेले.

तुम्ही लावलेल्या शोधामुळे तुम्ही ओळखले जाता आणि शोधाच्या उपयुक्तते मुळेही कोणत्याही संशोधनामध्ये प्रथम तुम्ही उंदरावर प्रयोग करता, नंतर माकडावर नंतर डुकरावर आणि नंतर मनुष्यावर तुमच्या अस लक्षांत येतं कीं हे असफल झाले आहे. हे अतिशय धोकादायक आहे कारण काहिं औषधे, काहि वेळा कांहि लोकांना घातक (विषारी) ठरतात कारण प्रत्येक व्यक्तीची जडण घडण भिन्न असते आणि त्याचे प्रश्नही वेगळे असतात. जो पर्यंत आपण कशा पासून बनलो आहोत, आपली अंतर्गत यंत्रणा काय आहे आणि हे रोग कसे निर्माण होतात हे जाणून घेत नाही तो पर्यंत आपण काहिही अचूकतेने करु शकणार नाही विशेषतः ॲलोपॅथीक औषधे ही उष्णता निर्माण करणारी असतात. त्यामुळे उष्णतेचे निराकरण करण्यासाठी आणखी कांहितरी घ्यावे लागते ज्याचे साईड इफेक्टस् परत आपल्याला माहित नसतात.

सहज योग मेटासायन्स आहे. इथे तुम्हाला कोणतेही संशोधन करायचे नाही हयाच्यावर अगोदरच संशोधन झालेले आहे आणि आपल्याला त्याच्यावर वर्षानुवर्षे मेहनत करायला नको किंवा माकडे, उंदीर हयाच्यावर प्रयोगही करायला नकोत. शिवाय त्याच्यामधे स्पेशलायझेशन नाही. उदाहरणार्थ - अलीकडे एका डोळयासाठी एक डॉक्टर तर दुसऱ्या डोळयासाठी दुसरा डॉक्टर असतो, आणि काही वेळा तुम्हाला तुमचे पाकिट पूर्ण रिकामे करावे लागते. मध्यंतरीच्या काळात ते तुमचे अवयवही काढून टाकू शकतात. वैद्यक शास्त्रातील ह्या आंधळेपणा मुळेच मी या शास्त्राकडे आकृष्ट झाले.

मी असा विचार केला कीं मला त्याची परिभाषा आणि त्यांच्या समस्या माहिती व्हायला पाहिजेत. आता आपण असे समजून घेतले पाहिजे किं हे जग रोगराईनी भरलेले आहे, आणि हया जगात असे पुष्कळ लोक आहेत कि ज्यांना ॲलोपॅथीचे उपचार परवडत नाहीत. पश्चिमेतले बरेचसे

डॉक्टर सहज योग घेत नाहीत कारण ते असा विचार करतात कि औषधाशिवाय जर पेशंट बरे झाले तर त्यांना पुरेसे पैसे मिळणार नाहीत.

वैद्यकीय क्षेत्र हा एक मोठा उद्योग धंदा झाला आहे. त्या बरोबरच विक्री व्यवसायातील तज्ञ त्याचा धंदा म्हणून स्विकार करतात. मला कशाचाही बाजार करायचा नाही आणि मला तुमच्या कडून कसलीही अपेक्षा नाही. मला फक्त वैद्यकीय व्यवसायातील नैतिकता जागृत करायची आहे. जिथे आपण पैशासाठी नव्हे तर करुणपोटी काम करु. मला असे लोक भेटतात कि ज्यांना कोणताही सहजयोगी बरे करु शकतो.

माणसामध्ये सात चक्र व तीन नाडया आहेत. म्हणून सात गुणिले तीन बरोबर एकवीस एवढे मुळ प्रश्न असू शकतात., किंवा त्याच्या संयोगामुळे निर्माण झालेले कांहि प्रश्न असू शकतात. त्याचे निदान तुमच्या बोटांवर होऊ शकते. कुराणामधे महंमद साहेबांनी असे लिहून ठेवले आहे कीं तुमचे हात बोलू लागतील.

मुलत: तीन प्रकारच्या समस्या असतात. डाव्या बाजूच्या किंवा मध्य मार्गाच्या समस्या. तुम्ही जर एखाद्या सहज योग्याला विचारले तर तो तुम्हाला सांगेल की तुमच्या डाव्या बाजूचा प्रश्न आहे. किंवा उजव्या बाजुचा प्रश्न आहे. एवढेच काय ते आहे, आणि करण्याची साधी गोष्ट ही कीं डावी किंवा उजवी बाजू भक्कम करायची किडनी काम करेनाशी झाली तर डॉक्टर डायलेसिस करतात. सर्वांना माहिती आहे की पेशंटला तुम्ही वाचवू शकत नाही व त्याला आयुष्यभर डायलेसिसवर ठेवावे लागते. दुर्दैवाने एका प्रसिध्द डायलेसिस तज्ञाची किडणी निकामी झाली. तो म्हणाला की मला डायलेसिस करायचे नाही कारण मला माहित आहे की ते आयुष्यभर करावे लागेल. मला ते परवडणार नाही आणि डायलेसिस करूनही उपयोग होत नाही, आणि पैसेही उपत नाहीत, म्हणून मी ह्या डॉक्टरला सांगीतले की सहजयोग तुम्हाला शंभर टक्के बरे करेल. परंतू तुम्ही मला असे वचन दिले पाहिजे की तुम्ही डायलेसिसचा परत वापर न करता सहजयोगाचा वापर करून लोकांना बरे केले पाहिजे. त्यांनी असे वचन दिले आणि ते बरेही झाले. परंतू ते अजुनही डायलेसिसचा वापर करत आहेत. मी म्हणाले की आतां तुम्ही डायलेसिसचा वापर का करत आहात ? ते म्हणाले की ही मशिनरी घेण्यासाठी आम्ही पुष्कळ पैसे खर्च केले आहेत आणि जर आम्ही ते परत मिळवीले नाहीत तर आमचे कसे काय होईल ? आम्ही दिवाळखोर होऊ. मी म्हणाले असेही तुम्ही अनेक लोकांना दिवाळखोर बनवलेच आहे. त्यामुळे बदल म्हणून तुम्ही दिवाळखोर झालेले चांगले. तरी ही अशी मनोवृत्ती आहे.

* * *

प्रश्न – डॉक्टर : श्री माताजी आम्ही डॉक्टर्स पेशंटना बरे करतो की ते स्वत:च बरे होतात. डॉक्टर ह्या नात्याने आमचे सहजयोगात काय कर्तव्य आहे ?
श्री माताजी : जीवनाचा सर्वात महत्वाचा हेतू ईश्वराचे साधन बनणे हा आहे. आणि तुमच्या व्यवसायात बऱ्याच गोष्टी इतरांपेक्षा जास्त लौकर लक्षात येतील. पेशंटना बरे करणे हा तुमचा हेतू असेल, पण जर बरे करताना पैसा मिळविणे हा हेतू असेल तर तुम्ही सहजयोगी नाहीत. पैसा मिळविणे हे ठिक आहे. असे बरे, पेशंट आहेत की ज्यांना तुम्ही सहजयोगांत आल्यामुळे बरे करू शकाल. तुम्ही सहजयोगांत आल्यावर सुस्थित असाल. बरेच सर्जनस् यशस्वी झालेले मी पाहिले आहेत. कारण तुम्हाला त्या माणसांच्या स्थितीचे संपूर्ण ज्ञान होते व तुमच्या व्यवसायांतही तुम्ही तरबेज/तज्ञ होता. अर्थात तुम्ही तुमच्या उदरभरणासाठी पैसा मिळवीलाच पाहीजे. जे डॉक्टर्स सहजयोगी आहेत ते सुस्थितीत आहेत. एम. डी. करणाऱ्यांपैकी एका डॉक्टरला दुसऱ्या देशांत संशोधनासाठी शिष्यवृत्ती मिळाली आहे.

आज पौर्णिमा आहे याचा अर्थ पूर्ण चंद्र. या नियमांच्या विषयी बोलण्यासाठी व आपल्या शिष्यांना हे नियम समजून आत्मसात करता येतील इतक्या पातळीपर्यंत उन्नत करण्यासाठी गुरु हा संपूर्ण व्यक्तिमत्व असावा. हे अंतर भरून काढण्यासाठी गुरु असतो व त्याच्यासाठी गुरु उच्च गुणवत्तेचा आत्मसाक्षात्कारी व उच्च स्थितीपर्यंत उत्क्रांत झालेला असावा लागतो.

गुरु तपस्वी अथवा जंगलात रहाणारा असला पाहिजे असे नाही. तो सर्वसाधारण, कुटुंब वत्सल असू शकतो, राजा असू शकतो.

बाह्यातील आपले जीवन कसेही असले तरी त्याच्या मुळे काही बिघडत नाही. तुमचे स्थान, म्हणजे जगातील तथाकथित स्थान काहीही असले तरी जो पर्यंत, तुम्ही ईश्वराचे नियम आत्मसात केले नाहीत तोपर्यंत त्या स्थानामुळे काही फरक पडत नाही.

❖ ❖ ❖

# गुरु पूजा - १९८१

## गुरु पूजा कां आयो!जित केली जाते ?

प्रत्येक शिष्याने आपल्या गुरुची पूजा करणे महत्वाचे आहे, हे आपण जाणून घ्यावे. परंतु गुरु खरा असावा. शिष्याचा फायदा घेणारा, परमेश्वराने ज्याला आधिकृत केले नाही असा नसावा. परमेश्वराच्या नियमांची तुम्हाला दीक्षा दिली असल्यामुळे व मानवाचे धर्म काय आहेत हे तुम्हाला सांगीतले असल्यामुळे, पूजेचे आयोजन केले जाते.

त्याच्या साठी वास्तविक तुम्हाला गुरुची आवश्यकता नसते पुस्तके वाचून परमेश्वराचे नियम काय आहेत ते शिकता येते परंतु तुम्ही त्या नियमांचे पालन करीत आहात इकडे गुरुला लक्ष द्यायचे असते. हे नियम आचरणात आणायचे असतात. स्वतःच्या जीवनात उतरावयाचे असतात. हे अवघड असते. गुरुंच्या शिवाय, म्हणजेच तुम्हाला सुधारणाऱ्या शक्तिच्या शिवाय परमेश्वराच्या नियमांचे पालन करणे फार अवघड असते. कारण मानवी चेतना व परमेश्वरी चेतना यांच्यात फार मोठे अंतर आणि हे अंतर जो गुरु स्वतः पूर्ण आहे, तोच फक्त भरु शकतो.